## जाहीर नोटीस

मौजे रहाटणी येथे मंजुर विकास योजने व्यतिरिक्त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार रस्ते मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. नरवि।कावि।रहाटणी।१०७।१०, दि. २२।२।२०१० अन्वये घोषित करणेत आलेले आहेत.

सदर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रस्थापित केलेला रस्त्या पैकी मौजे रहाटणी येथील स.नं. ४२,४५ व ४९ या मिळकती मधून जाणारा ९.०० मी. रुंदीचा रस्ता रद्द करणेबाबत मा." ड " प्रभाग समिती ठराव क्र. १९, दि. ०७।०८।२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब सर्व संबंधितांना या नोटीसव्दारे कळविण्यात येते की उपरोक्त मा. "ड" प्रभाग समिती ठरावास अनुसरुन मौजे रहाटणी येथील स.नं. ४२,४५ व ४९ या मिळकतीमधील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेला ९.०० मी. रुंदीचा रस्ता रद्द करणेचा महानगरपालिकेचा मानस आहे.

तरी सदरचे मौजे रहाटणी येथील स.नं. ४२,४५ व ४९ या मिळकतीमधील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेला ९.०० मी. रुंदीचा रस्ता रद्द करणेबाबत कोणाची हरकत अथवा सुचना असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांचे कडे आपली हरकत लेखी स्वरुपात नोंदविण्यात यावी. सदर रद्द करावयाच्या रस्त्याचा नकाशा सर्व नागरिकांना पहाण्यासाठी उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांचे कार्यालयामध्ये सर्व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपलब्ध आहे. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास महानगरपालिका वर नमूद रस्ता रद्द करण्याची कार्यवाही करेल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जाहिरात क्रमांक ३४९
दिनांक १३।१०।१५

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे- ४११०१८